Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-IV APRIL 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

२१व्या शतकातील नभोनाटयाचे स्वरूप

प्र.प्राचार्य.डॉ.अनिल प्रभाकर उबाळे
मराठी विभागप्रमुख
प्रा.डॉ.एन.डी.पाटील महाविद्यालय मलकापूर
ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर

१. प्रस्ताविक :

नभोनाटय हे साहित्याचे प्रमुख अंग आहे. परंतु या साहित्यप्रकाराकडे कुणाचेही फारसे लक्ष असल्याचे दिसत नाही. रेडिओवरील कार्यक्रम हे १९९० च्या दशकात भारतीयांच्या मनोरंजनाचे साधन होते. पण हल्ली दुरचित्रवाणीने प्रत्येक घराचा ताबा घेतल्याने रेडिओवरील कार्यक्रमाकडे आपोआपच दुर्लक्ष झाले. रेडिओ हा मनोरंजनाचा जेव्हा प्रमुख स्त्रोत होता तेव्हा रेडिओवरून प्रक्षेपित होणा-या वेगवेगळया कार्यक्रमांचे श्रोतेही वेगवेगळे होते. नभोनाटय ऐकणा-यांचासुध्दा एक विशेष वर्ग होता. कुठल्याही परिस्थितीत हा श्रोतावर्ग नभोनाटय ऐकण्याचे चुकवत नसे. सध्या मोबाईल कॉम्प्युटर लॅपटॉप टॅब यासारखी मनोरंजनाची साधने उपलब्ध असल्याने रेडिओसारख्या साधनाकडे आपोआपच दुर्लक्ष झाले. दोन दशकापूर्वी जरी दुरचित्रवाणी घरोघरी पोहचली असली तरी लोक केवळ रामायण, महाभारत यासारख्या मालिकांनाच पसंती देत असत. दुरचित्रवाणीवर शनिवारी रात्री प्रसारीत होणारा हिंदी चित्रपट मात्र पाहण्यासाठी गर्दी होई. याव्यतिरीक्त रेडिओ हा मनोरंजनाचा एक प्रमुख स्त्रोत होता. रेडिओवर लागणारे शेतीविषयक कार्यक्रम तसेच लोकसंगीत चित्रपटसंगीत व आरोग्यविषयक कार्यक्रम यांनाही विशेषकरून श्रोत्यांकडून पसंती मिळत असे. नभोनाटय ऐकणा-यांचा एक मोठा श्रोतावर्ग होता. सोमवारी रात्री साडेनऊ वाजता महाराष्ट्रातील प्रमुख केंद्रावरून नभोनाटय प्रक्षेपित होत असे. एखाद्या कादंबरीचे रूपांतरीत नभोनाटय असेल तर त्याच्या श्रृंखलांचे प्रक्षेपण होत असे. उदा.**ना.स.इनामदारांची** ‘ **राऊ**’ ही कादंबरी पहिले बाजीराव पेशवे आणि मस्तानी यांच्या प्रेमसंबंधावर आधारित आहे. १९९७ मध्ये आकाशवाणी पुणे केंद्राने या कादंबरीचे नभोनाटयात रूपांतर केले होते.या नभोनाटयाच्या तब्बल त्रेचाळीस श्रृंखला श्रोत्यांना ऐकायला मिळाल्या.

सध्याची नभोनाटयाची अवस्था पाहता ती तितकीशी चांगली नाही. एकतर नभोनाटय ऐकणारा श्रोतावर्ग आज फार दुर्मिळ झाला आहे. नभोनाटय लिहणा-या लेखकांचीही अवस्था फारशी चांगली नाही.त्यांना संहितेचे थोडे फार पैसे आकाशवाणीकडून मिळतात परंतु त्या लेखकाला कुठेही प्रसिध्दी मिळत नाही. दोन तीन दशकापूर्वी नभोनाटय लिहिणा-या लेखकांमध्ये जोश होता. कारण श्रोतावर्गाची त्यांना वाहवा मिळत असे. आता लोकसंख्या प्रचंड वाढूनही लोकांचा नभोनाटयाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. अगदी मुठभर श्रोतावर्ग आजही नभोनाटय उत्सुकतेने ऐकतो.परंतु असा श्रोतावर्ग वार्धक्यामुळे काळाच्या पडद्याजवळ उभा आहे. एकदा ही नभोनाटय ऐकणारी पिढी संपली की मग नभोनाटयाचे भविष्य काय ? हा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय रहात नाही. म्हणूनच एक साहित्याचा भाग म्हणून नभोनाटयाचा अभ्यास कुठेतरी होणे गरजेचे आहे असे वाटते.

२०व्या शतकाच्या सुरवातीला **मार्कोनी** यांनी रेडिओचा शोध लावला आणि हे शतक ‘ **रेडिओचे शतक**’ म्हणून ‘ **ब्रिटीश टाईम्स**’ या वार्तापत्राने जाहीर केले.कारण ‘या शतकात रेडिओएवढा दुस-या कुठल्याच वस्तुचा उपयोग जगाला झाला नाही’ असे या वार्तापत्राचे तत्कालीन संपादक डेव्हिड जॉन्सन यांनी सांगितले.१ सुरूवातीच्या काळात या साधनाचा

उपयोग जरी मोठया प्रमाणात संदेशवहनासाठी केला जात असला तरी **हिटलर आणि मुसोलिनीसारख्या** धुर्त राज्यकर्त्यांनी या साधनांचा दुरूपयोग केल्याचे आढळते. हिटलर स्वत: त्याच्या आत्मचरित्रात सांगतो की त्याला मिळालेल्या यशापयशाची चर्चा करणारे एकमेव साधन म्हणजे रेडिओ आहे. दुस-या महायुध्दाच्या काळात हिटलरने संपूर्ण जर्मनीभर लोकांच्या भावना पेटवणारी प्रक्षोभक भाषणे केली आणि त्याच्या या भाषणांचा परिणाम म्हणूनच जेव्हा हजारो ज्युंना देशद्रोही समजून त्यांना गॅस चेंबरमध्ये घालून ठार मारले तरीही जर्मनीतील आम जनता हा निर्दयी देखावा निदर्यी डोळयांनी पहात होती.तरीही त्यांच्यातला आंतरात्मा जागला नाही. कारण हिटलरने एवढे भयंकर विष जर्मन लोकांच्या नसानसात भिनवले होते की लोक मानवतेच्या पलिकडे जाऊन विचार करू लागले होते.हिटलरने त्याच्या भाषणात संदेश पुनरावृत्ती हे कौशल्य वापरले होते. त्याने भाषणात वापरलेल्या शब्दांचा यथायोग्य उपयोग करून **१९४८ मध्ये 'रायझिंग हिटलर फॉलिंग हिटलर' हे नभोनाटय यास्मीन हर्बर्ट** या अफगाणी नभोनाटयकाराने लिहिले आणि ब्रिटीश ब्रॉडकास्टींगने हे नभोनाटय जगाला पुन्हा पुन्हा ऐकविले.त्यामुळे हिटलरच्या संमोहनातून जग हळू हळू बाहेर आले.२ हिटलरच्या मृत्यूनंतरही त्याच्या आकाशवाणी बर्लिन केंद्रावरून प्रक्षेपित झालेल्या भाषणांचा परिणाम लोकांच्या मनावर खोलवर रूजला होता. हा परिणाम संपवून हिटलर हे नैराश्यवादातून जन्माला आलेलं एक भयंकर आपत्य होतं हे हर्बर्ट यांनी जगाला दाखवून दिले आहे. इटलीमध्ये मुसोलिनीने आकाशवाणी रोम केंद्राचा वापर करून लोकांच्या भावना पेटविण्याचे काम केले.'प्रखर राष्ट्रवाद' या गोंडस नावाखाली त्यानेही हजारो लोकांच्या रक्ताचे पाट वाहिले.नरीमन स्टुअर्ट यांनी मुसोलिनीविषयी 'हॅलो रोम' या वृत्तपत्रात १९४६ साली म्हटले की मुसोलिनी हा रेडिओचा यथायोग्य वापर करणारा काळाच्या उदरात जन्मलेला एक भयानक किडा होता.३ नंतर स्टुअर्ट यांनी **'वन्स देअर वॉज मुसोलिनी'** हे पुस्तक लिहिले. यातील तिसरे प्रकरण **'मुसोलिनी आणि रेडिओ'** असे आहे.मुसोलिनीने रेडिओचा चाणाक्षपणे उपयोग केला होता.१९६० साली रेडिओवर **'ॲन्टोनी आणि मुसोलिनी'** नावाचे एक नभोनाटय प्रक्षेपित झाले.याचा कर्ता माहित नसला तरी या नभोनाटयातून मुसोलिनीच्या वेडेपणावर आणि क्रूरपणावर प्रकाश टाकला आहे. पुढे काळानुसार नभोनाटयाचे स्वरूप बदलत गेले.

२. जागतिक नभोनाटयाची वाटचाल :-

२०व्या शतकात जगभरात अगणित नभोनाटये लिहिली गेली.काळाच्या बंधनात न अडकता ब-याच नभोनाटयकारांनी मानवी मुल्यांची जोपासना करणा-या संहिता लिहिल्या त्यांचा यथायोग्य परिणाम जगाच्या मानसिकतेवर झाला. त्या त्या परिसरात बोलल्या जाणा-या बोलीभाषेत नभोनाटये लिहिली गेली. उदा. अफ्रिकेतील प्रसिध्द इंग्रजी कादंबरीकार चिनुआ ॲचिबी यांनी त्यांच्या मुळ आदिवासी **'इग्बो'** भाषेत सात नभोनाटये लिहिली. ही सर्व नभोनाटये नंतर इंग्रजी भाषेत रूपांतरीत झाली. यातून एका नवीन संस्कृतीचा जगाला उलगडा झाला. या अगोदर अफ्रिकन माणसं म्हणजे रानटी आणि क्रूर अशी प्रतिमा इंग्रजांनी साहित्यात मांडली होती.पॉलीश लेखक **जोसेफ कोनरॅड** यांनी त्याच्या 'हार्ट ऑफ डार्कनेस' या कादंबरीत अफ्रिकन लोकांना असंस्कृत लोक असे संबोधले होते. या सर्वांचा धिक्कार करून चिनुआ ॲचिबी यांनी 'द मॅन ऑफ पिपल' आणि 'थिंग्ज फॉल अपार्ट' या कादंब-यामध्ये अफ्रिकन लोकांची खरी प्रतिमा मांडण्याचा प्रयत्न केला आहे.४ त्यांच्या नभोनाटयामध्ये त्यांनी अफ्रिकन संस्कृतीचे अनेक बारकावे टिपलेले आहेत.त्यांच्या **' इनाहा आयलो'** (मी सांगतो म्हणून) या नभोनाटयाने तर कमालच केली. १९७४ साली प्रक्षेपित झालेल्या या नभोनाटयात अनेक प्राण्यांच्या आवाजाचा वापर करण्यात आला आहे. ज्याप्रमाणे अफ्रिकन लोक जंगली प्राण्यांची शिकार करतात त्याप्रमाणे ते जगातील मानवरूपी क्रूर आणि हिंस्त्रा प्राण्यांचीही शिकार करू शकतात हे या नभोनाटयातून ॲचिबी यांनी मांडले आहे.

सिडनी आकाशवाणी केंद्रावरून **जेम्स व्हाईट** या ऑस्ट्रेलियन नभोनाटयकाराच्या अनेक संहिता प्रक्षेपित झाल्या. यातून त्यांनी मानवी स्वभावाचे चित्रण टिपले आहे. या संहिता ऑस्ट्रेलियन टाईम्स या वर्तमान पत्रात १९९० ते ९३ या काळात प्रसिध्द झाल्या. यातून त्यांचा मानवी संस्कृतीचा सखोल अभ्यास दिसून येतो.

वरील सर्व नभोनाटयातून जगभरातील नभोनाटयकारांवर खोलवर परिणाम केला. त्यामुळे जगभरातील काही निवडक नभोनाटयांचा उल्लेख याठिकाणी करणे इष्ट होईल. १९७२ साली आकाशवाणी बर्लिन केंद्रावरून प्रक्षेपित झालेले **'मुन ओव्हर मोरोक्को' (मोरोक्को पर्वतावरील चंद्र** या नभोनाटयातील जग फार वेगळे आहे. जॅक फलॅडर्स हा या संहितेचा नायक आहे. त्याला त्याच्या एकलकोंडया जगाचा तिटकारा वाटत असला तरी नैतिक आणि अनैतिकतेतील फरक शोधण्याचा तो प्रयत्न करतो. शेवटी त्याला समजते की मोरोक्को शहराच्या दक्षिणेकडे ज्या पर्वतरांगा आहेत त्या पर्वतरांगावरून दिसणारा चंद्र त्याच्या समस्येचा उलगडा करू शकेल. अनेक संकटे पार करून तो तेथे पोहचतो तेव्हा त्याला तांबूस रंगाच्या चंद्राचे विलोभनीय दर्शन घडते व त्याच्या स्वभावात विलक्षण बदल होतो. तो चंद्र त्याला नकळत सांगून जातो की विनाकारण काही गूढ प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करू नको. त्याने केवळ आयुष्याचा अनमोल वेळ वाया जाईल हाती मात्र काही लागणार नाही. दुस-या महायुध्दानंतर जगभर पसरलेल्या नैराश्याला मुठमाती देण्याचे काम हे नभोनाटय करते.

डॉल्टोन ट्रम्बो या लेखकाने १९३८ मध्ये ' जॉनी गॉट हीज गन' हे पुस्तक लिहिले. यात पहिल्या महायुध्दाचे भीषण परिणाम रेखाटले आहेत. यातील एका प्रसंगावर आधारीत १९४० मध्ये आर्च ऑबोलर यांनी एक नभोनाटय लिहिले. यातील नायक बहिरा आंधळा आणि चेहरा विद्रुप झालेला असा लुळा - पांगळा आहे. या संपूर्ण संहितेत एकाच व्यक्तिच्या वेगवेगळया मनोगतांचा वापर अतिशय कौशल्याने करून पहिल्या महायुध्दाचे भीषण चित्र उभा केले आहे. नायकाच्या मनोगतावरून त्याच्या चेह-यावरील भयानकतेचे दर्शन श्रोत्याच्या मनपटलावर जसेच्या तसे उभे राहते. यातून युध्दाचे भयानक दुष्परिणाम श्रोत्यांना विचार करण्यास भाग पाडतात.

एच.जी.वेल्स यांची 'वॉर ऑफ द वल्ड'या कादंबरीवर आधारीत २०व्या शतकाच्या चौथ्या दशकात याच नावाचे एक नभोनाटय आले. यात कुठल्याही परग्रहावरून काही लोक येतात आणि पृथ्वीवरील माणसांचे वाफेत रूपांतर करतात . हे नभोनाटय ऐकून श्रोत्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले व माणसांतील माणूसपण जागे झाले व ते मानवी मूल्यांची जपणूक करू लागले. पृथ्वीसारख्या अनेक ग्रहावर माणसं राहतात ती मानवी मूल्यांची जपणूक करतात मग पृथ्वीवरील माणूसच एवढा उपरा कसा या प्रश्नाचे उत्तर लेखकाने देण्याचा प्रयत्न केला आहे. या नभोनाटयात 'परग्रहावरील लोक' ही संकल्पना पहिल्यांदाच मांडली गेली.५

मिटबॉल फुल्टॉन यांनी १९९४ मध्ये 'रूबी कोट' नावाचे नभोनाटय लिहिले. यात सुम्मा नुल्ला नावाचा एक ग्रह दाखवला आहे. येणा-या काही वर्षामध्ये तेथे रूबी नावाची स्त्री अस्तित्वात येईल. ती पुरातत्वशास्त्र तज्ञ असेल. तिच्याकडे काळचक्राचा वेग कमी करण्याची शक्ती असेल. हा वैज्ञानिक विषय घेवून फुल्टॉन यांनी जग किती रहस्यमय आहे याचा उलघडा करण्याचा प्रयत्न केला आहे. माणसाला ही रहस्ये जाणण्यासाठी किती वर्षे द्यावी लागणार आहेत हे या नभोनाटयातून मांडले आहे. ज्याप्रमाणे रूबी नावाची स्त्री काळचक्राचा वेग कमी करू शकते त्याप्रमाणे मानवाला या काळचक्राचा वेग वाढवता यावा. तसेच या काळचक्राबरोबर वेगाने धावताही यावे अशी संकल्पना फुल्टॉन यांनी या नभोनाटयातून मांडली.

३. नभोनाटय संकल्पना :-

नभोनाटयाचा अभ्यास करणे जेवढे कठीण तेवढेच आवश्यक आहे. एखाद्या कलेचा अंत हा एखाद्या पिढीच्या अंतापेक्षा भयानक असतो. नभोनाटयाकडे दिवसेंदिवस होत चाललेल्या दुर्लक्षामुळे याचा अभ्यास मागे पडला आहे असे वाटते. मराठी भाषेत हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच नभोनाटय संहिता पकाशित झाल्या आहेत. पण इतर

आंतरराष्ट्रीय भाषेमधील नभोनाटये मात्र प्रकाशित झाली आहेत. उदा. अलबर्ट ॲडम यांनी इंग्रजी नभोनाटयाचा समिक्षात्मक इतिहास हे १९९० मध्ये पुस्तक लिहिले यात त्याने तब्बल तीन हजार इंग्रजी नभोनाटयाचा समावेश केला आहे.

जर्मन आणि फ्रेंच भाषेतील अनेक नभोनाटये आज पुस्तकाच्या रूपाने उपलब्ध आहेत.श्लमर राईस यांच्यामते '' नभोनाटयाचा अभ्यास हा एका जिवंत मानवी कलेचा अभ्यास आहे.ज्यामध्ये श्रोत्यांना ऐकीव शब्दांना साजेसा रंगमंच उभा करावा लागतो असे कुठल्याही इतर कलांमध्ये घडत नसल्याने नभोनाटय हे इतर कलांच्या तुलनेने लिहिण्यास अवघड व आजमावून पाहण्यास प्रयोगशील आहे''.६ तमीळ भाषेत शेकडो नभोनाटये लिहिणारे आर.रामालिंगम यांनी त्याच्या 'पडदा व पडद्यामागील नाटक' या पुस्तकात नभोनाटयाला एक दर्जा देण्याचा प्रयत्न केला आहे. नभोनाटय हे नाटक लिहिण्याइतके सोपे नाही.याविषयी ' वादळात नाव सापडावी. तरीही नावाडयाने खचून न जाता वादळाचा धैर्याने सामना करावा पण अशात जहाजाला एखादे छिंद्र पडावे मग त्याची जी दानादान उडते अशीच दानादान नभोनाटयाची संहिता लिहिणा-या नभोनाटयकाराची होते.नावाडी त्याच्या कामात यशस्वी होतो की नाही हे माहित नाही पण नभोनाटयकार मात्र या कामात पुर्ण तया यशस्वी होतो.याविययी डी.एच .लॉरेन्स. ऑस्कर वाईल्ड असतील किंवा भारतीय नाटयविचारवंत रामालिंगम असतील. प्रत्येकजन आपापल्या कलांना श्रेष्ठ मानतात. रामालिंगम यांनी शेकडो नभोनाटय लिहिली आहेत त्यामुळे त्यांना नभोनाटय इतर कलांपेक्षा श्रेष्ठ आहे असं म्हणण्याचा जणू अधिकारच मिळाला आहे.

ख्रिस्तोपर कॉडवेल यांच्या इलुजन ॲण्ड रीयालिटी या पुस्तकाचे गाग्री देसाई यांनी १९९१ मध्ये आभास आणि वास्तवता या नावाने रूपांतर केले. यात त्यांनी नभोनाटय हा मानवी मनाचा अगदी प्रारंभीचा सौंदर्यविषयक आविष्कार नसला तरी २०व्या शतकात स्वत:चे अस्तित्व ठामपणे सिध्द करणारा हा कलेचा एक उत्कृष्ट आविष्कार आहे.वाङ्मयीन कलेच्या अवस्थेत नभोनाटय ही एक वेगळी निर्मिती दिसून येते.नभोनाटय ही अशी कला आहे की ज्यातून इतिहास धर्म आणि संस्कृती यांचा प्रवाह एकाच माध्यमातून वाहतो.जेथे जेथे सुसंस्कृत मानवाचे वाङ्मय अबाधित आहे तेथे नभोनाटय नाही असे होत नाही.

थॅंक्यू मिस्टर ग्लॅड नावाचे मराठीत एक नभोनाटय १९९७ मध्ये नागपूर आकाशवाणी केंद्रावरून प्रक्षेपित झाले.हे एक रहस्यमय नभोनाटय आहे. यातील प्रत्येक पात्रा एकदाच बोलते.याची कथा १३ व्या शतकातील इटालियन कथाकार बोकॉशिओच्या डेकॅमेरॉन या काव्याच्या कथेशी जुळणारी आहे.ज्याप्रमाणे डेकॅमेरॉन मधील तीन पुरूष आणि सात बायका रोम या शहराला प्लेगच्या साथीने झपाटले होते तेव्हा ते आपला जीव वाचविण्यासाठी घर सोडतात व एका अज्ञात प्रदेशाचा प्रवास करतात.त्यावेळी ते आपल्या जीवनातील एक एक आठवणी एकमेकांना सांगतात.तेव्हा ती दहा माणसे एकमेकांत किती गुंतली आहेत याचा शोध लागतो. अशीच गोष्ट थॅंक्यू मिस्टर ग्लॅड या नभोनाटयात आहे.यातील बारा पात्रो (सात स्त्रिया आणि पाच पुरूष मिस्टर ग्लॅडचा शोध घेत असतात. यातील मनोरमा या पात्राला मिस्टर ग्लॅड यांनी लग्नाचे वचन दिल्यावर ती त्याला आपले सर्वस्व अर्पण करते.तर मनोहर या पात्राच्या मते मिस्टर ग्लॅड हा नव्वद वर्षाचा एक जख्खड म्हातारा आहे. ज्याने मनोरमा नावाच्या मुलीला दत्तक घेतले.तर शिल्पमती या पात्राच्या मते मिस्टर ग्लॅड हा तिच्याकडे पेईंग गेस्ट म्हणून बारा वर्षापासून रहात होता. त्यामुळे त्यांची चांगली मैत्री झाली व त्याचे रूपांतर अनैतिक संबंधात झाले होते.हे नभोनाटय समजण्यास कठीण आहे.

अशा प्रकारची अनेक नभोनाटय वेगवेगळया मराठी आकाशवाणी केंद्रावरून प्रकाशित झाली. पण अशा गुढ नभोनाटयाचा विचार प्रेक्षकांच्याकडून झालेला दिसत नाही. कारण नाटक व नभोनाटय हे तंत्रादृष्टया वेगळे असते.यासंदर्भात जेम्स बोरलॉग याचे नाटक आणि नभोनाटय हे पुस्तक मराठीत शांता आगाशे यांनी भाषांतरित केले. त्यात त्यांनी नाटक हे नभोनाटयापेक्षा श्रेष्ठ असते कारण ते श्रोत्यांना वेगवेगळया पध्दतीने समजून घेण्याचा प्रयत्न करते तसे नभोनाटयात घडत नाही असे मत मांडले.७

नभोनाटय हा साहित्याचा एक प्रमुख प्रकार आहे. आज रसिक प्रेक्षक व समीक्षक या दोघांनीही या प्रकाराकडे पाठ फिरवली आहे.याला सध्याची मनोरंजनाची साधने कारणीभूत आहेत. प्रसिध्द नाटककार महेश दत्तानी यांनी मुंबईच्या पृथ्वी थियटरमध्ये त्यांच्या एका नाटकाच्या रंगमंचावरील प्रयोगाच्या पूर्वसंध्येला एक वक्तव्य केले होते.ते वक्तव्य असे होते."नाटक म्हणजे डोंगर पोखरून उंदीर काढणे व नभोनाटय म्हणजे राईच्या पोटात सोन्याच्या पर्वताचा शोध लागणे.नाटक म्हणजे अनेक कलाकार आणि तांत्रिक मंडळी एकत्रा येवून रंगमंच नावाच्या व्यासपिठावर घातलेला बौध्दिक धिंगाणा होय.यातून प्रेक्षक किती शिकतो ते माहित नाही.रंगमंचावर सादर होणा या नाटकाकडे केवळ मनोरंजन म्हणून पाहिले जाते. नभोनाटयाचे मात्रा तसे नसते. अर्जुनाने जसा पक्ष्याच्या डोळयाचा अचूक नेम साधला तसे नभोनाटय हे हदयाच्या अचूक वेदनेला स्पर्श करते. रंगमंचावरील नाटक पाहताना समोर दिसणा या दृश्याला डोळे आणि कान बांधले जातात पण मन मात्रा मोकाटच राहते.नभोनाटयात दृश्यस्वरूपात काही नसते म्हणून मनपटलावर मनाला एक रंगभूमी उभी करावी लागते पात्रांना स्थिर करावे लागते.एका निष्णात दिग्दर्शकाप्रमाणे मन हे सदैव कार्यरत असते.म्हणून जर मला कुणी विचारले नाटक श्रेष्ठ की नभोनाटय तर माझे उत्तर असेल नभोनाटय! ८

४. नभोनाटय लेखनाचे विशेष :

नभोनाटयाव्दारे आकाशवाणीवरून मानवी आवाजात श्रोत्यांशी संवाद साधला जातो. मनोरंजनातून लोकशिक्षण लोकप्रबोधन लोकजागृती करणे हा नभोनाटयाचा प्रमुख हेतू असतो.नभोनाटय हे आकाशवाणीसारख्या श्राव्य माध्यमाव्दारे साक्षर तसेच निरक्षर श्रोत्यांपर्यत प्रभावी संवादाव्दारे पोहचवले जाते.या साहित्यकृतीच्या प्रवासात संहितेपासून ते प्रसारणापर्यतचा प्रवास होताना मूळ गाभा कधीच हरवला जात नाही. तर मुळापेक्षा तो अधिक जिवंत झाल्याचा अनुभव येतो. त्यामुळे नभोनाटय हा एक महत्त्वाचा प्रकार असल्यामुळे श्रोत्यांनी त्याचा आस्वाद घेतला पाहिजे.

५. संदर्भग्रंथ :-

१. डेव्हिड जॉन्सन ; द पोस्टमॉडर्न इडिटोरीयल वर्ल्ड. ऑक्सफर्ड प्रिंटींग प्रेस ऑक्सफर्ड १९९८ पृ.क्र.११०.
२. यास्मीन हर्बर्ट ; रायझिंग हिटलर फॉलिंग हिटलर. हॅवन पब्लिकेशन हॅवन २००१ पृ.क्र.४७.
३. नरीमन स्टुअर्ट ; वन्स देअर वॉज मुसोलिनी. व्हॉईस पब्लिकेशन रोम १९६० पृ.क्र.२७.
४. हेन्री रॉबर्ट ; द ब्लॅक व्हॉईस. गटेनबर्ग प्रेस गटेनबर्ग १९७३ पृ.क्र.९८.
५. एच.जी.वेल्स ; वॉर ऑफ द वर्ल्डस् इंडियाना पब्लिशिंग हाऊस इंडियाना १९७० पृ.क्र.२१६.
६. इल्मर राईस ; ड्रामा : व्हाईसड् ॲण्ड व्हाईसलेस. बीग कल्चर प्रेस हर्बर्ट १९७९ पृ.क्र.३२.
७. शांता आगाशे; नाटक आणि नभोनाटय. गुलमोहर प्रकाशन. नागपूर १९९७ पृ.क्र.११.
८. निर्मला कुलकर्णी ; रिव्हू ऑफ द ड्रामा. निराली प्रकाशन मुंबई २००७ पृ.क्र.११३.